मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी चिंचवड शहरासाठी हाय कॅपेसिटी मास ट्रान्सिट रूट आणि ई-आरटीएस प्रकल्पाला गती

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहात उच्चस्तरीय बैठक संपन्न; प्रायोगिक प्रकल्पाच्या तातडीने अंमलबजावणीच्या सूचना



**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे व पिंपरी चिंचवड शहरांमधील वाढत्या वाहतूक गरजा लक्षात घेऊन एचसीएमटीआर (हाय कॅपेसिटी मास ट्रान्सिट रूट) आणि ई-आरटीएस (इलेक्ट्रिक रॅपिड ट्रान्सिट सिस्टीम) या महत्त्वाकांक्षी सार्वजनिक वाहतूक प्रकल्पाच्या अंमलबजावणीला गती द्यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने या प्रकल्पासाठी आवश्यक प्रशासकीय, तांत्रिक व नियोजनासंदर्भातील सर्व कार्यवाही तातडीने सुरू करून प्रायोगिक प्रकल्प नियोजित कालावधीत पूर्ण करावा आणि नागरिकांना आधुनिक, पर्यावरणपूरक आणि कार्यक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

पुणे व पिंपरी चिंचवड शहरांमधील वाढती लोकसंख्या, वेगाने वाढणारे शहरीकरण आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवरील वाढता ताण लक्षात घेऊन भविष्यातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम, गतिमान व प्रवाशाभिमुख करण्याच्या दृष्टीने एचसीएमटीआर (हाय कॅपेसिटी मास ट्रान्सिट रूट) आणि वर्तुळाकार मार्ग विकास प्रकल्पाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली २७ जुलै २०२६ रोजी सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे उच्चस्तरीय बैठक संपन्न झाली, त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता, अपर मुख्य सचिव के. एच. गोविंदराज, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, पुणे महानगर विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त अभिजित चौधरी, पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, अति पोलीस आयुक्त मनोज पाटील आदी यावेळी उपस्थित होते.

यावेळी ई-आरटीएस (इलेक्ट्रिक रॅपिड ट्रान्सिट सिस्टीम) या अत्याधुनिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या संकल्पनेची माहिती आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे दिली. ही प्रणाली मेट्रोप्रमाणेच वेगवान, सुरक्षित आणि आरामदायी असून रबर टायरवर धावणाऱ्या पूर्णतः इलेक्ट्रिक वाहनांवर आधारित असेल. एका वाहनामध्ये सुमारे २४० हून अधिक प्रवासी प्रवास करू शकतील, अशी क्षमता या प्रणालीमध्ये असेल, असेही ते यावेळी म्हणाले.

या प्रकल्पाचा पहिला टप्पा म्हणून सुमारे १७ किलोमीटर लांबीचा प्रायोगिक मार्ग विकसित करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. या मार्गामध्ये गोडाऊन चौक – कुदळवाडी चौक – ऑटो क्लस्टर – काळेवाडी फाटा – जगताप डेअरी चौक – वाकड या प्रमुख भागांचा समावेश करण्यात आला आहे. हा प्रकल्प महामेट्रोच्या सहकार्याने सुमारे एक ते दीड वर्षांच्या कालावधीत प्रायोगिक तत्त्वावर कार्यान्वित करण्याचे नियोजन बैठकीत मांडण्यात आले.

प्रायोगिक प्रकल्प यशस्वी झाल्यानंतर एचसीएमटीआर व शहरातील सर्व बीआरटी मार्गांवर ई-आरटीएस प्रणालीचा टप्प्याटप्प्याने विस्तार करण्यात येणार आहे. तसेच शहरातील सर्व मेट्रो स्थानके, रेल्वे स्थानके आणि इतर सार्वजनिक वाहतूक व्यवस्थांशी प्रभावी व सुलभ जोडणी निर्माण करून नागरिकांना अखंड, जलद आणि प्रवाशाभिमुख प्रवासाचा अनुभव देण्याचा या प्रकल्पाचा उद्देश असल्याचे सादरीकरणात स्पष्ट करण्यात आले.

या प्रकल्पामुळे शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास, प्रदूषणात घट होण्यास, सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढण्यास तसेच नागरिकांना अधिक सुरक्षित, जलद आणि पर्यावरणपूरक प्रवासाची सुविधा उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार असल्याचेही बैठकीत नमूद करण्यात आले.

सादरीकरणानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार तसेच उपस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या संकल्पनेचे स्वागत करून प्रकल्पास मान्यता दर्शविली. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने ई-आरटीएस प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक प्रशासकीय व तांत्रिक कार्यवाही तातडीने सुरू करावी, तसेच प्रायोगिक प्रकल्प नियोजित कालावधीत पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही गतीने करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

बैठकीत झालेल्या चर्चेनुसार एचसीएमटीआर आणि ई-आरटीएस प्रकल्पामुळे पिंपरी चिंचवड शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल घडून येण्यास मदत होणार असून, भविष्यातील शाश्वत, आधुनिक आणि एकात्मिक शहरी वाहतूक व्यवस्थेच्या दिशेने हा महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

> **"पिंपरी चिंचवड शहराच्या भविष्यातील वाहतूक गरजा लक्षात घेऊन एचसीएमटीआर आणि ई-आरटीएस या एकात्मिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची संकल्पना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मांडली. शहरातील मेट्रो, बीआरटी आणि इतर सार्वजनिक वाहतूक व्यवस्थांना प्रभावीपणे जोडणारी, पर्यावरणपूरक, उच्च क्षमतेची आणि प्रवाशाभिमुख अशी ही प्रणाली विकसित करण्याचा आमचा प्रयत्न आहे. मुख्यमंत्री महोदयांनी प्रकल्पाच्या संकल्पनेचे स्वागत करत त्याच्या तातडीच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक कार्यवाही गतीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. महानगरपालिका या प्रकल्पाची नियोजनबद्ध आणि वेळेत अंमलबजावणी करून नागरिकांना आधुनिक, सुरक्षित आणि कार्यक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध आहे.**
>
> **- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**



# मोशी, डुडुळगावमध्ये रस्त्यांची दुरवस्था

## विकासकांच्या फायद्यासाठी अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी आणि डुडुळगाव परिसरामध्ये नागरी समस्यांनी उग्र रूप धारण केले असून, प्रशासनाच्या भोंगळ कारभारामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. मोशीतील लक्ष्मीनगर भागात रस्त्यांची प्रचंड दुरावस्था झाली असून रस्त्यांवर पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे दररोज नागरिकांचे अपघात होत आहेत. या गंभीर समस्येबाबत महापालिका प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही अधिकाऱ्यांकडून खड्डे बुजविण्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले जात होते.



एका बाजूला रस्त्यांची ही दयनीय अवस्था असताना, दुसरीकडे डुडुळगाव, लक्ष्मी चौकातील परिसरामध्ये प्रशासनातील अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार चव्हाट्यावर आला आहे. स्थानिकांना कोणत्याही विकासकामांची पूर्वकल्पना न देता किंवा विश्वासात न घेता, महापालिकेचे अधिकारी थेट विकासकांच्या फायद्यासाठी कामे करत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.

विकासकांच्या सोयीसाठी टाकण्यात आलेल्या ड्रेनेज लाईनचे काम अत्यंत चुकीच्या पद्धतीने करण्यात आले आहे. ही नवीन ड्रेनेज लाईन ज्या मुख्य लाईनला जोडण्यात आली आहे, ती पुढे अवघ्या १०० फुटांवर बंद आहे. परिणामी, या लाईनचे सांडपाणी पुढे न जाता दुसऱ्यांच्या कंपाऊंडमध्ये साचत असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. लोकप्रतिनिधींना डावलून केवळ बांधकाम व्यावसायिकांचे हित जपणाऱ्या अधिकाऱ्यांच्या या मनमानी कारभारामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. आता या बाबत थेट आयुक्तांसोबत बैठक घेऊन अधिकाऱ्यांना जाब विचारणार आहेत.

> “ चुकीच्या पद्धतीने ड्रेनेज लाईन जोडल्यामुळे नागरिकांच्या कंपाऊंडमध्ये सांडपाणी साचत आहे. हा अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार आम्ही खपवून घेणार नाही. पक्षनेत्यांच्या सूचनेनुसार आम्ही लवकरच या सर्व परिस्थितीबाबत थेट महापालिका आयुक्तांची भेट घेणार असून, नागरिकांच्या जिवाशी खेळणाऱ्या आणि चुकीची कामे करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करणार आहोत.”
>
> **- सारिका गायकवाड,नगरसेविका**

> “ तात्पुरती उपाययोजना खडी आणि मुरूम टाकण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. पावसाळा संपल्यानंतर डांबरी करण्याचे काम केले जाईल.
>
> **- शिवाजी वाडकर**
> **अभियंता स्थापत्य विभाग**



# मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने ई-आरटीएस प्रकल्पाच्या अंमलबजावणीला गती

## महापौर, आयुक्त व पदाधिकाऱ्यांची संयुक्त बैठक संपन्न; प्रशासकीय कार्यवाही तातडीने सुरू करण्याचा निर्णय

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम, गतिमान आणि पर्यावरणपूरक करण्यासाठी इलेक्ट्रिक रॅपिड ट्रान्झिट सिस्टीम (ई-आरटीएस) या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या अंमलबजावणीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आवश्यक प्रशासकीय आणि तांत्रिक कार्यवाही तातडीने सुरू करण्याचे निर्देश दिले होते. या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात महापौर रवी लांडगे, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे आणि सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांच्या उपस्थितीत संयुक्त आढावा बैठक संपन्न झाली.



मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत पिंपरी चिंचवड शहरासाठी ई-आरटीएस आणि हाय कॅपेसिटी मास ट्रान्झिट रूट (एचसीएमटीआर) प्रकल्पाला गती देण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेच्या स्तरावर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसंदर्भातील पुढील कार्यवाही, आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया, तांत्रिक नियोजन तसेच प्रकल्पाच्या कालबद्ध अंमलबजावणीबाबत या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीमध्ये ई-आरटीएस प्रकल्पाच्या प्रायोगिक टप्प्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक विभागीय समन्वय वाढविणे, तांत्रिक बाबींची पूर्तता करणे, विविध यंत्रणांशी समन्वय साधणे आणि नियोजित कालावधीत प्रकल्प सुरू करण्यासाठी आवश्यक सर्व कार्यवाही गतीने पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला.

ई-आरटीएस ही अत्याधुनिक, पूर्णतः इलेक्ट्रिक आणि उच्च क्षमतेची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था असून, शहरातील मेट्रो, बीआरटी, रेल्वे स्थानके आणि इतर सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेशी प्रभावी जोडणी निर्माण करण्यास ती महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या प्रकल्पामुळे शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास, प्रदूषणात घट होण्यास, सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढण्यास तसेच नागरिकांना सुरक्षित, जलद आणि आधुनिक प्रवासाची सुविधा उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार असल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले.

तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी करून ई-आरटीएस प्रकल्पाला अपेक्षित गती देण्यासाठी महानगरपालिका सर्व संबंधित विभागांच्या समन्वयातून नियोजनबद्ध पद्धतीने कार्यवाही पार पाडण्याबाबत यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

# पवना धरण 100 टक्के भरले; पाणी कपात तात्काळ रद्द करा!

## राष्ट्रवादीच्या माजी महापौर डॉ. वैशाली घोडेकर यांची मागणी, महापालिका सर्वसाधारण सभेत सभागृहाचे लक्ष वेधले

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी-पवना धरण १०० टक्के भरलेले असताना पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना पाणी कपातीचा सामना करावा लागणे ही अत्यंत दुर्दैवी बाब असून, शहरातील लागू असलेली पाणी कपात तात्काळ रद्द करून पूर्ववत नियमित, पुरेसा आणि वेळेवर पाणीपुरवठा सुरू करण्यात यावा, अशी ठाम मागणी माजी महापौर वैशाली घोडेकर यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत केली.



पिंपरी-चिंचवड शहरातील सुमारे ४० लाख नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेल्या या विषयाकडे सभागृहाचे लक्ष वेधताना त्यांनी सांगितले की, शहराला जीवनदायी ठरणारे पवना धरण पूर्ण क्षमतेने भरले असून, धरणाच्या पाणलोट क्षेत्रात समाधानकारक पाऊस झाल्याने नदीपात्रातूनही नियमित पाण्याचा विसर्ग सुरू आहे. त्यामुळे शहरावरील पाणीटंचाईचे संकट मोठ्या प्रमाणात दूर झाले आहे. असे असतानाही महापालिकेकडून अद्याप पाणी कपात कायम ठेवण्यात आली आहे. यामुळे नागरिकांसह गृहनिर्माण संस्थांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असून, अनेक सोसायट्यांना आजही टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे.

माजी महापौर वैशाली घोडेकर यांनी प्रश्न उपस्थित करताना सांगितले की, पवना धरण शंभर टक्के भरलेले असताना शहरावर पाणी कपातीचे संकट कायम ठेवण्यामागे नेमके कारण काय आहे, याबाबत प्रशासनाने नागरिकांना स्पष्ट उत्तर देणे आवश्यक आहे. महापालिकेच्या आवाहनाला प्रतिसाद देत नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर केला. आता धरण पूर्ण क्षमतेने भरल्यानंतर नागरिकांना पुरेशा प्रमाणात पाणी मिळणे ही त्यांची रास्त अपेक्षा आहे.

त्यांनी पुढे सांगितले की, पाणी ही प्रत्येक नागरिकाची मूलभूत गरज आहे. शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, औद्योगिक व व्यावसायिक आस्थापना तसेच घरगुती वापरासाठी पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध होणे अत्यावश्यक आहे. शहराचा वेगाने वाढणारा विस्तार आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता नियमित व नियोजनबद्ध पाणीपुरवठा करणे ही महापालिकेची प्राथमिक जबाबदारी आहे.

पाणी कपातीमुळे नागरिकांना टँकरसाठी अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागत असून, सर्वसामान्य कुटुंबांचे आर्थिक नियोजन कोलमडत असल्याकडेही त्यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. तसेच, धरण पूर्ण क्षमतेने भरले असतानाही पाणी कपात कायम ठेवली जाणार असेल, तर भविष्यात पाणीसाठा किती टक्के झाल्यानंतर पाणी कपात रद्द करण्यात येणार, याबाबत स्पष्ट आणि पारदर्शक धोरण नागरिकांसमोर मांडण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

माजी महापौर घोडेकर यांनी महापालिका प्रशासनाकडे चार प्रमुख मागण्या केल्या आहेत. त्यामध्ये शहरातील लागू असलेली पाणी कपात तात्काळ रद्द करणे, पूर्ववत नियमित व पुरेसा पाणीपुरवठा सुरू करणे, भविष्यात पाणी कपात लागू करण्यासाठी व रद्द करण्यासाठी स्पष्ट धोरण निश्चित करून ते जाहीर करणे तसेच शहरातील प्रत्येक भागात समान आणि न्याय्य पाणी वितरण सुनिश्चित करणे, या मागण्यांचा समावेश आहे. याशिवाय, महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने सध्याच्या उपलब्ध पाणीसाठ्याचे, दररोजच्या पाणी वापराचे आणि आगामी वर्षभराच्या पाणी नियोजनाचे श्वेतपत्रक सभागृहासमोर सादर करावे, अशीही त्यांनी ठाम मागणी केली.

### महापालिका आयुक्तांचा सकारात्मक प्रतिसाद...

**» दरम्यान, माजी महापौर वैशाली घोडेकर यांनी उपस्थित केलेल्या मागणीची दखल घेत महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. पाणीपुरवठ्याच्या सध्याच्या परिस्थितीचा तातडीने आढावा घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक बोलावण्यात येणार असून, शहरातील लागू असलेल्या पाणी कपातीबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी सभागृहात दिले. पवना धरणातील उपलब्ध पाणीसाठा, शहराची दैनंदिन पाण्याची गरज आणि भविष्यातील नियोजनाचा सर्वंकष विचार करून नागरिकांच्या हिताचा निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले..**

**“पाणी हा केवळ प्रशासकीय विषय नसून तो प्रत्येक नागरिकाच्या जीवनाशी, आरोग्याशी आणि सन्मानाने जगण्याच्या अधिकाराशी संबंधित आहे. पवना धरण पूर्ण क्षमतेने भरलेले असताना नागरिकांना पाणी कपातीचा सामना करावा लागणे ही दुर्दैवी बाब आहे. त्यामुळे नागरिकांच्या हिताचा विचार करून प्रशासनाने तात्काळ सकारात्मक निर्णय घ्यावा.**

**- डॉ. वैशाली घोडेकर, माजी महापौर, पिंपरी-चिंचवड.**

# चिंचवडमध्ये गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित आधार नोंदणी व दुरुस्ती शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद..

## "नागरिकांच्या सोयीसाठी असे समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबवणार" – संतोष सौंदणकर

**पुणे | प्रतिनिधी**

गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून रमामंगल सोशल फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विशेष आधार नोंदणी व दुरुस्ती शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिवसेना जिल्हा संघटक तथा रमामंगल सोशल फाउंडेशनचे संस्थापक-अध्यक्ष संतोष रमाकांत सौंदणकर यांच्या पुढाकाराने हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.



शनिवार (दि. २५) रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत चिंचवड येथील गुरुकृपा हाउसिंग सोसायटी, रस्टन कॉलनी येथील संतोषभाऊ सौंदणकर यांच्या जनसंपर्क कार्यालयात हे शिबिर पार पडले. दिवसभर परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध सेवांचा लाभ घेतला. यावेळी कैलास भंडारी, विजयकुमार पाटील, आनंद ढगे, बाप्पू वाघमारे, गुलाब मुलाणी, फिरोज खान, संतोष मोरजकर, गणेश गाडे, ओमप्रसाद परदेशी, आश्विन मायणले, कार्तिक सुतार, स्वप्नील गाडे उपस्थित होते.

शिबिरामध्ये नवीन आधार नोंदणी, बायोमेट्रिक अपडेट, नाव व पत्ता दुरुस्ती, विवाहानंतर नाव बदल, जन्मतारीख दुरुस्ती तसेच हरवलेल्या आधार कार्डाची पुनर्प्राप्ती अशा विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. याशिवाय ज्येष्ठ नागरिक आणि गरजू व्यक्तींसाठी होम एनरोलमेंट सेवाही उपलब्ध करून देण्यात आली.

यावेळी संतोष सौंदणकर यांनी सांगितले की, आधार कार्डाशी संबंधित कामांसाठी शासकीय कार्यालयांमध्ये वारंवार फेऱ्या माराव्या लागत असल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. ही गैरसोय लक्षात घेऊन स्थानिक पातळीवरच सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यामुळे नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले. भविष्यातही रमामंगल सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून अशा विविध सामाजिक, आरोग्यविषयक आणि प्रशासकीय उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी रमामंगल सोशल फाउंडेशनचे सचिव सुमित कांबळे, उपाध्यक्ष गणेश ओगले, सदस्य सुभाष मालुसरे कार्यकर्ते आणि स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हा उपक्रम यशस्वी ठरल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली.

# मोशीत 34 तासांहून अधिक काळ वीज गायब

## महावितरणच्या ढिसाळ नियोजनामुळे हजारो नागरिक अंधारात

**पुणे | प्रतिनिधी**

मोशी परिसरात सलग ३४ ते ३६ तास वीज पुरवठा खंडित झाल्यामुळे येथील नागरिक संतप्त झाले असून जनजीवन विस्कळीत झाले. हजारो रहिवाशांना अंधारात राहावे लागले. या वीज खंडित होण्याचा सर्वाधिक फटका मोशीतील शंकेश्वर ग्रॅविटी सोसायटी, कुदळवाडी आणि वाय जंक्शन परिसराला बसला. याशिवाय डुडुळगाव येथील साई तिरुपती ग्रीन्स, कुदळवाडीतील सिल्वर होम्स, नक्षत्र आयलंड आणि न्यू बीआरटी रोडवरील श्यामा फॉर्च्युन या सोसायट्यांमध्येही तासनतास वीज नसल्याने नागरिक हैराण झाले. केवळ मोशीच नव्हे, तर लगतच्या मामुर्डी परिसरातही सलग १६ तास वीज गुल होती.

सलग एवढा वेळ वीज गायब राहिल्याने सोसायट्यांमधील पाणीपुरवठा, लिफ्ट सेवा आणि इंटरनेट यंत्रणा पूर्णपणे ठप्प झाली. याचा सर्वाधिक फटका वर्क फ्रॉम होम करणाऱ्या आयटी कर्मचाऱ्यांना बसला असून त्यांचे कामकाज पूर्णपणे रखडले. वीज नसल्याने ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना प्रचंड त्रास करावा लागत आहे. विशेष म्हणजे नागरिकांनी महावितरणच्या हेल्पलाइनवर वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र प्रशासनाकडून कोणताही योग्य प्रतिसाद मिळाला नसल्याने रहिवाशांमध्ये महावितरण प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला.




> "मोशी आणि परिसरातील सोसायट्यांमध्ये वीज गायब झाल्याने पिण्याच्या पाण्याचा आणि लिफ्टचा गंभीर प्रश्न निर्माण झाला. एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या भागात महावितरणची ही निष्काळजीपणाची भूमिका अत्यंत संतापजनक आहे. नवीन उपकेंद्र आणि फीडरचे काम कागदावर न ठेवता तातडीने प्रत्यक्षात आणून नागरिकांना दिलासा द्यावा.
>
> - सारिका गायकवाड, नगरसेवक

> "मोशी फिडर अंदाजे २५ किलोमीटरचा आहे. त्यामुळे कोणत्याही ठिकाणी बिघाड झाल्यास सर्व फिडर चा पुरवठा बंद होतो . यशदा सुप्रीम, शंकेश्वर ग्रॅव्हिटी,. ओस्टिया, नक्षत्रा सिल्वर, होम साई, तिरुपती ग्रीन्स, श्यामा फॉर्च्यून अशा अनेक सोसायटी याच फिडरवर असल्यामुळे कोणत्याही भागात बिघाड झाल्यास सर्व मोशी भागातील विद्युत पुरवठा खंडित होतो. यावर उपाय म्हणून नक्षत्र आयलँड येथे उपकेंद्र चालू करण्यात आले आहे. त्यामुळे सदर मोशी फीडरचे स्वतंत्र पाच फीडर होणार आहेत. त्यामुळे एका ठिकाणी बिघाड झाल्यास संपूर्ण परिसराचा विद्युत पुरवठा खंडित होणार नाही."
>
> - विजया पवार, अभियंता, महावितरण

> "सलग ३०-३५ तास वीज घालवून महावितरणने नागरिकांना वेठीस धरले आहे. वर्क फ्रॉम होम करणाऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. महावितरणने तातडीने स्वतंत्र फीडरचे नियोजन पूर्ण करून वीज पुरवठ्याबाबत कायमस्वरूपी नियोजन करावे , अन्यथा नागरिकांसह महावितरणच्या कार्यालयावर आंदोलन छेडले जाईल."
>
> - निखिल बोऱ्हाडे, नगरसेवक

# मुसळधार पावसाने पवना धरण 96 टक्क्यांवर; आंद्रा शंभर टक्के भरले, पिंपरी परिसरात मुसळधार, तीन गावांचा संपर्क तुटला

## पवना, आंद्रा, वडिवळे धरणांत मुसळधार पावसामुळे साठा झपाट्याने वाढला; मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरु, नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा




**पुणे | प्रतिनिधी**

मागील तीन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे धरण साठ्यातील पाणीपातळी झपाट्याने वाढत आहे. पवना धरण ९६.६३ टक्के आणि आंद्रा धरण १०० टक्के भरले असून, 'पवना' तून ६, ८००, वडिवळे ३, ५९२, कासारसाई ७५० क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. धरण पाणलोट क्षेत्रात सोमवारी झालेल्या मुसळधार पावसामुळे धरणात एकाच दिवशी एक टीएमसी पाण्याची आवक झाली असून, धरणात ८.२२ टीएमसी इतका पाणीसाठा झाला आहे.सोमवारी सायंकाळी सहा वाजता धरण ९६.६३ टक्के भरले होते. धरणातील साठा हा २६४.०१ दलघमी इतका असून, पाणीपातळीत ६१२.८९ मीटरने वाढ झाली आहे. तसेच आंद्रा आणि वडिवळे धरण पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस सुरू आहे.

आंद्रा धरण १०० टक्के भरले असून, धरणातून १, ५७२ क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. वडिवळे धरण ९७.८६ टक्के भरले असून, ३, ५९२ क्युसेक विसर्ग कुंडलिका नदीपात्रात सुरू आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा धरण विभागाच्या वतीने देण्यात आला आहे.

### कोथुर्णे पूल पाण्याखाली; तीन गावांचा संपर्क तुटला

» पवनानगर : पवना धरण परिसरामध्ये पावसाचा जोर कायम असून, सोमवारी सायंकाळी धरणातून ६, ८०० क्युसेकने विसर्ग सुरू होता. त्यामुळे पवना नदीवरील कोथुर्णे पूल पाण्याखाली गेला आहे. परिणामी, कोथुर्णे, वारू, मळवंडी ठुले या गावांचा संपर्क तुटला आहे. पावसामुळे ओढे, नाले, ओढे दुथडी भरून वाहत आहे. त्यामुळे धरणाच्या पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ झाली आहे. विसर्ग सुरू केल्याने सांडव्यातून ५, ४०० क्युसेक तर जलविद्युत केंद्रातून १, ४०० क्युसेक विसर्ग सुरू केल्याची माहिती पवना धरण विभागाने दिली आहे.